*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

# Unit 2 : Methods of Philosophy

## प्रकरण दुसरे : तत्त्वज्ञानाच्या पध्दती

**मा**णूस हा विचार करणारा प्राणी आहे.आता, या विधानाचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. 'माणूस हा विचार करणारा प्राणी आहे.' या विधानाचे किमान दोन अर्थ आहेत.

1. पहिला अर्थ असा की एकूण सजीव प्राण्यांमध्ये विचार करण्याची क्षमता केवळ माणसातच आहे.

गेल्या कोट्यावधी वर्षांपासून माणसाने ही क्षमता विकसित केली आहे. 'विचार' ही केवळ माणसाच्याच बाबतीत शक्य असणारी घटना आहे. माणूस सतत विचार करतो, याचा अर्थ जगात कुठे ना कुठे कुणीतरी विचार करीतच असतो. एखाद्याने विचारच करावयाचा नाही, असा विचार करून स्वत:पुरती विचार करण्याची प्रक्रिया बंद केली तरी इतर कुणीतरी विचार करतोच. ही प्रक्रिया थांबलेली नसते. ती सतत चालू असते. म्हणूनच माणूस विचार करणाारा प्राणी आहे, असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. थोडक्यात, **प्रत्येक माणसाकडे विचार करण्याची क्षमता असते. पण प्रत्येकजण विचार करेलच, असे नाही**.

2. दुसरा अर्थ असा की, विचार करणारा प्रत्येक माणूस योग्य रितीने विचार करेलच, असे नाही.

सामान्य माणूस मुख्यत: आपल्या भावना, इच्छा, वासना यांच्या आहारी जावून विचार करतो.परिणामी अविचारीच कृतीच घडताना दिसते. सामान्य माणूस वस्तुनिष्ठ विचार करीलच असे नसते. त्याची विधाने भावनिक, अवास्तव, गैरसमज पसरवणारी, दिशाभूल करणारी असू शकतात. म्हणूनच हेतूपूर्वक सुसंगत विचार करण्याची सुव्यवस्थित पध्दती विकसित करावी लागते.

3. ती विकसित करण्याचे काम सुध्दा अर्थातच माणूसच करतो.त्यांना **विचारी माणसे** किंवा **विचारवंत** म्हणता येईल. अशी विचारवंत माणसांचे मुख्यत: दोन प्रकार होतात:

**(अ)शास्त्रज्ञ आणि (ब)तत्त्ववेत्ते.**

शास्त्रज्ञ ज्या पध्दतीने विचार करतो तिला **शास्त्रीय पध्दती** म्हणतात.प्रत्यक्ष निरीक्षण, अनुभव, प्रयोग, पडताळा,निष्कर्ष मार्गाने शास्त्रीय पध्दतीचे स्वरुप निनिश्चत होते.जगात सर्वत्र हीच पध्दती शास्त्रज्ञ उपयोगात आणतात.

तत्त्ववेत्ता मात्र **तात्त्विक पध्दतीने** विचार करतो. अशी तात्त्विक पध्दती म्हणजेच तात्त्विक विचार करण्याची पध्दती होय. या पध्दतीचा उपयोग करुनच तत्त्वज्ञान निर्माण करता येते. म्हणून तत्त्वज्ञानाची पध्दती याचा अर्थ तत्त्वज्ञान निर्मितीची पध्दती असते. प्रत्येक तत्त्ववेत्ता आणि तत्त्वज्ञानातील संप्रदाय आपापल्या तात्त्विक धारणेनुसार ( म्हणजेच तत्त्वज्ञानानुसार ) आपली विचार करण्याची पध्दती निश्चित करतो.

तत्त्ववेत्त्याची विचार पध्दती एकतर त्याने स्वत:च निर्माण केलेली असते किंवा ज्या संप्रदायाचे प्रतिनिधीत्व करीत तो असतो त्या संप्रदायाने ती दिलेली असते.उदाहरणार्थ सॉक्रेटीसची पध्दती,प्लेटोची पध्दती, देकार्तची पध्दती या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या पध्दती ह्या व्यक्तिगत पध्दती आहेत. त्यामुळे त्या त्यांच्या नावाने ओळखल्या जातात. तर अनुभववादाची पध्दती,बुध्दिवादाची पध्दती इत्यादी पध्दती सांप्रदायिक पध्दती आहेत.

तत्त्वज्ञानाच्या या पध्दती प्रत्येकाला किंवा अन्य विचारसरणीच्या अनुयायांना मान्य झाल्याच पाहिजेत,असे नाही. मान्यता - अमान्यतेचा मुद्दा समन्वयातून सोडवावयाचा असतो.उलट मान्य नसेल तर तो मुद्दा खोडून

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

काढणे, नवे विचार मांडणे ही प्रक्रिया घडते. त्यातून एकमेकांच्या पध्दतीची देवाणघेवाण करता येत असते. अशा अनेक पध्दती आहेत. त्यापैकी तीन पध्दतींचा अभ्यास आपण करणार आहोत.त्या पुढीलप्रमाणे :

अ) संवाद पध्दती (सॉक्रेटीस)
ब) संशय पध्दती (देकार्त)
क) वाद पध्दती (वाद,जल्प,वितण्ड )



## अ) संवाद पध्दती (सॉक्रेटीसची प्रश्नोत्तर पध्दती)

सॉक्रेटीस (इ.स.पू. 470 ते 399) हा प्राचीन तत्त्ववेत्ता ग्रीक तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी आहे.अथेन्स शहराचा तो रहिवासी होता.त्याचे वडिल मूर्तिकार आणि आई सुईण होती.त्याच्या पत्नीचे नाव झांटिपी होते.दिसायला अत्यंत सामान्य आणि जवळपास अर्धपशू असणारा सॉक्रेटीस अत्यंत नीतिवान ,नि:स्वार्थी ,विनम्र व प्रसन्न व्यक्तिमत्वाचा होता. ''आपणास ईश्वरी संदेश येतात'', असा त्याचा दावा होता. तो तरुणांना विचार करण्यास शिकवित असे.

राज्यसंस्थेचे देव नाकारुन सॉक्रेटीस स्वत:चे देव मांडतो, असा आरोप त्याच्यावर 70 व्या वर्षी ठेवण्यात आला आणि त्याला हेमलॉक नावाचे विष पिण्याची शिक्षा देण्यात आली.त्याच्या शेवटच्या कालखंडात त्याला प्लेटो (इ.स.पू.431 ते 351) हा सर्वोत्तम शिष्य लाभला.

सॉक्रेटीसची पध्दती ही खरे तर प्लेटोची पध्दती आहे.प्लेटोने त्याचे सारे तत्त्वचिंतन नाट्यमय संवादरुपात लिहिले.त्यांनाच Dialogues म्हणतात.गुरुला श्रध्दांजली म्हणून त्याने आपल्या साऱ्या संवादात सॉक्रेटीसला मध्यवर्ती स्थान दिले. एखाद्या नाटकाप्रमाणे त्या संवादाची रचना आहे.त्यात सॉक्रेटीस हे मुख्य पात्र आहे. या संवादातूनच खरा सॉक्रेटीस समजतो.अथेन्समधील तरुणांशी तो संवाद साधून त्यांना तत्त्वचिंतनाचे धडे देतो.जणूकाही सहकारातून विचार करण्याचे प्रशिक्षणच तो देतो.

### सॉक्रेटीसचा उपरोध / सॉक्रेटीसची पध्दती

सॉक्रेटीसची नैतिक प्रतिभा प्रामुख्याने चिकित्सक होती.त्याने धैर्य, संयम, न्याय, दूरदर्शीपणा या सारख्या नैतिक सद्गुणांविषयीचे तत्कालिन सुशिक्षित व सुखवस्तू लोकांचे अज्ञान त्याने उघडकीस आणले. आत्म्याच्या नि:श्रेयस सद्गुणांविषयीचे लोकांचे अज्ञान विनाशकारी आहे, हे सॉक्रेटीसने त्यांना पटवून दिले.पण हे नाजुक व धोकादायक काम असल्याने त्याने अतिशय हळूवारपणे आणि चलाखीने केले



त्याची पध्दत अशी :

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



प्रथम सॉक्रेटीस स्वत:कडे कमीपणा घेतो,नम्रता धारण करतो.स्वत: ज्ञानी असूनहि अज्ञान असल्याची बतावणी करतो.आपण स्वत: इतरांकडून शिकू इच्छितो, असे दाखवितो.मग एखादा विषय घेवून एखाद्याला मत विचारतो किंवा त्या विषयाच्या दिशेने चर्चा सुरु करतो. नंतर तो संबंधित व्यक्तीला प्रश्न विचारुन व्याख्या करावयास सांगतो, त्या व्यक्तीने मत व्यक्त केले की मग सॉक्रेटीस त्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याची विनंती करतो.उदाहरणार्थ चर्चा 'धैर्य' या विषयावर असेल तर सॉक्रेटीस ''धैर्य म्हणजे नेमके काय'' असा प्रश्न उपस्थित करून चर्चा सुरू करीत असे.संबंधित व्यक्तीने ''अमुक अमुक करणे हे धैर्य होय'' असे म्हणून काहीएक वर्णन केले किंवा व्याख्या केली की सॉक्रेटीस मोठे समाधान दाखवितो.पण आपल्या काही शंका असून त्यांचे समाधान करण्याची विनंती करीतो.या शंका बोलून दाखवितो. त्यावेळी तो प्रश्न विचारतो. ते करताना मधेमधे न बोलता तो स्वत: गप्प बसणे पसंत करून संबंधितालाच बोलण्याची अधिक संधी देतो.पण त्याचवेळी चर्चेवर स्वत:चे नियंत्रण राहील, असे पाहतो. असे करीत करीत त्या वर्णनातील अथवा व्याख्येतील दोष शोधून देतो.ही चर्चा मग योग्य व्याख्या सापडेपर्यंत चालू राहते ![1] या पध्दतीचे एक ठळक उदाहरण घेवू :

***'जॉर्जिअस'*** हा एक संवाद आहे. हा संवाद जॉर्जिअस आणि सॉक्रेटीस यांच्यात झाला. या मुख्य संवादाच्या एका विभागात पुढील प्रश्नोत्तरे झाली.

सॉक्रेटीस: *मित्रा, ज्याला इमारती बांधण्याचे ज्ञान आहे त्याला आपण वास्तुविशारद (बिल्डर) म्हणू शकतो ना ?*

जॉर्जिअस : *होय.*

सॉक्रेटीस : *मित्रा, अगदी त्याप्रमाणेच ज्याला संगीत रचण्याचे ज्ञान आहे त्याला संगीतकार म्हणू शकतो ना ?*

जॉर्जिअस : *होय*

सॉक्रेटीस : *मग तर मित्रा, ज्याला औषधांचे ज्ञान आहे त्याला डॉक्टर म्हणू शकतो ना ?*

जॉर्जिअस *: होय*

सॉक्रेटीस *: मग अगदी तसेच इतर सर्वच कारागिर, तज्ञ यांच्याबाबतीत म्हणता येईल ना ?*

जॉर्जिअस : *होय*

सॉक्रेटीस : *मग याचा अर्थ असा झाला की जो जे जाणतो, ज्याला त्याच्या विषयाचे ज्ञान आहे आणि तो तो त्या त्या विषयात तज्ञ आहे , असे म्हणता येईल ना ?*

जॉर्जिअस *: होय, बरोबर आहे.*

सॉक्रेटीस *: तर मग मित्रा, नीतिमत्तेच्या बाबतीत तसेच नाही का होत ? ज्याला नीती- अनीतीचे ज्ञान आहे तो नीतीनेच वागेल, असे नाही का होत ?*

जॉर्जिअस *: होय तर ! निश्चितपणे.*

सॉक्रेटीस : *म्हणजे मित्रा, नीतीने वागणे म्हणजे नीतीचे ज्ञान असणे आणि नीतीचे ज्ञान असणे म्हणजेच नीतीने वागणे !*

जॉर्जिअस : *अगदी अचूक*

सॉक्रेटीस : *म्हणूनच नीती किंवा सद्‌गुण म्हणजेच ज्ञान !!*

जॉर्जिअस : *होय*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

[1] अनेकदा व्याख्या होईलच असे नाही. ती न करताही चर्चा थांबे किंवा चर्चेच्या ओघात व्याख्या सापडतही नसे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



सॉक्रेटीसच्या या पध्दतीला ***'प्रश्नोत्तर पध्दती'*** किंवा ***'संवाद पध्दती*** [2] असेही नाव आहे. ही संवादाची, संभाषणाची अशी पध्दत आहे की जिच्यात नैतिक सद्‌गुणांबद्‌दलची सर्वसामान्य लोकांची मते तपासून निश्चित तात्त्विक संकल्पना तयार केली जाते. सॉक्रेटीस एखाद्‌याला प्रश्न विचारुन व्याख्या करावयास सांगतो,मग त्या व्याख्येतील दोष शोधून देतो.दुसरी व्याख्या करावयास सांगतो. मग तिसरी,चौथी,पाचवी.असे करीत तो हे दाखवितो की या साऱ्या व्याख्या किंवा वर्णने म्हणजे बोलणाऱ्या त्या संबंधित माणसाचे स्वत:चे केवळ 'मत '*(Opinion)* आहे. मतास सार्वत्रिकतेचा दर्जा नाही. म्हणून ते सगळ्यांना स्वीकारता येईलच असे नाही.कारण मत नेहमी व्यक्तिगत पातळीवरील अंदाज असतो. म्हणून मत म्हणजे ज्ञान *(Knowledge )* नव्हे .

या प्रश्नोत्तर पध्दतीचा उपयोग करुन सॉक्रेटीस हे दाखवून देतो की लोक ज्याला नैतिक ज्ञान समजतात ते केवळ त्यांचे खासगी मत असते. कारण त्या मतात कोणतीही संकल्पना स्पष्ट केलेली नसते. नैतिक ज्ञान सद्‌गुणांचे असते.ज्यास आपण सद्‌गुण समजतो अशा प्रकारच्या सर्व कृतीमध्ये नेमके कोणते घटक समान आहेत ' हे कळाले की सद्‌गुणाचे ज्ञान होते. आणि हे ज्ञान होणे कठिण असते.कारण लोक स्वत:चे मत सोडू इच्छित नसतात. म्हणजे जे खरोखरी अज्ञानी आहेत व ज्यांची शिकवणी घेतली पाहिजे, त्यांच्याकडूनच शिकण्याचा आविर्भाव सॉक्रेटीस आणीत असे.हळू हळू लोकांचे अज्ञान उघडकीस आणून त्यांना सत्यज्ञानाकडे तो घेवून जातो.हा उपरोध आहे, पण बोचरा नाही तर तात्त्विक आहे. म्हणून त्याच्या ह्या पध्दतीला 'सॉक्रेटीसचा उपरोध' *(Socratic Irony)* म्हणतात.

## पध्दती कुणासाठी ?

सॉक्रेटीसची प्रश्नोत्तर पध्दती ही मुख्यत: सर्वसामान्य, विशेषत:बाजारपेठेतील लोकांना शिकविण्याची पध्दती आहे.ही सत्य संशोधनाची पध्दती आहे. सर्वसामान्य ही माणसे विद्‌यापीठात अथवा शिक्षणसंस्थेत शिकलेली विद्‌वान मंडळी नसतात तर व्यावहारिक जगातील माणसे असतात.स्वत:च्याच मताला चिकटून असतात. त्यांच्या मतांवर हल्ला केला तर संवाद थांबू शकतो.त्यामुळे त्यांच्या कलाने घेवून हळहळू त्यांच्याकडूनच त्यांची चूक लक्षात आणून देवून सत्य शोधावे लागते.

हे काम सुईणीसारखेच असते.सुईण बाळ निर्माण करीत नाही; तर आईच्या पोटात असलेले बाळ जगात सुरक्षित प्रवेश करावे, यासाठी ती त्या आईला केवळ मदत करीत असते. म्हणून तर सॉक्रेटीस तत्त्ववेत्त्याला सुईण म्हणतो. सॉक्रेटीसच्या पध्दतीची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :

## पध्दतीची काही वैशिष्ट्ये

***1) विधायक संशय आणि सत्य शोधनाची वृत्ती:*** सत्यशोधनासाठी आधी संशय घेणे नंतर तो सोडणे.

***2) संभाषणात्मक आणि चर्चात्मक :*** संभाषण,चर्चा करुन विविध मतंमधील एकमत शोधणे.

***3) व्याख्यात्मक आणि संकल्पनात्मक :*** नैतिक संकल्पनांची व्याख्या करुन संकल्पना निश्चित करणे.

***4) अनुभवाधारित आणि विगामी :*** ही पध्दत प्रत्यक्ष विशिष्ट अनुभव घेवून त्यातील समान तत्त्व शोधते. ती

[2] सॉक्रेटीसच्या पध्दतीला ***'द्‌वंद्‌वविकास पध्दती'*** म्हणतात. दोन परस्परविरोधी गोष्टींचा वाद होवून त्यातून दोघांना सामावून घेणारी तिसरी गोष्ट निर्माण होणे,याला द्‌वंद्‌वविकास म्हणतात.यात ही तिसरी गोष्ट पुन्हा अन्य दुसऱ्या वादासाठी पहिलीच्या जागी येते, तिला विरोध करणारी दुसरी येते ; त्यांचा समन्वय होवून पुन्हा तिसरी येते.असे अंतिम तत्त्व सापडेपर्यन्त घडत राहाते. ही पध्दती सॉक्रेटीसने झीनो (इ.स.पू.489 ते 430) या तत्त्वेत्त्याकडून उचलली. या पध्दतीला द्‌वंद्‌वविकास पध्दती / विरोधविकास पध्दती dialectic method हे नाव ॲरिस्टॉटलने (इ.स.पू.384 ते 322) दिले.ही पध्दती नंतर हेगेल (1770 ते 1831) आणि मार्क्स (1818 ते 1883)या तत्त्ववेत्त्यांनी स्वीकारली.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

विशिष्ट उदाहरणे घेवून सामान्य नियमाकडे जाते. म्हणजेच 'विशिष्टा'⟹'सामान्या' कडे प्रवास घडतो.

सॉक्रेटीसवर त्याच्या आईचा विशेष प्रभाव असावा.त्याची आई सुईणीचे काम करी. सुईण मूल निर्माण करीत नाही पण स्त्रीच्या पोटात असेलेले मूल नीटपणे सुरक्षितपणे जगात प्रवेश करावे, याचा ती प्रयत्न करते. सॉक्रेटीसच्या मते विचारांच्या क्षेत्रातील तो सुईणच आहे.'' लोकांना प्रश्न विचारून त्यांच्या मनातील विचार बाहेर काढण्याचे काम मला देवानेच दिले आहे.मी देवाने पाठविलेली गोमाशी आहे.गोमाशी जशी प्राण्यांना मुकाट्याने बसू देत नाही.सतत स्वच्छता करण्याचे काम करण्यास त्यांना भाग पाडते, तसे देवाने मला लोकांना विचार करण्यास भाग पाडण्यासाठी पाठविले आहे.म्हणून मला ते केलेच पाहिजे. ते न करणे हा देवाचा अपमान होईल, म्हणून मी ते काम आमरण करणारच '' असे तो ॲपॉलॉजीत म्हणतो. म्हणून त्याची पध्दती एका अर्थाने ' प्रसूती पध्दती '' च म्हंटली पाहिजे.



## अज्ञानाची कबुली हीच ज्ञानाची सुरुवात !

या पध्दतीतून एक गोष्ट स्पष्ट होते, ती अशी की स्वत:कडे कमीपणा घेणे याचा अर्थ इतरांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव करून देणे असते. स्वत:चे अज्ञान प्रकट करणे, ही अवघड गोष्ट आहे.पण ते तत्त्वचिंतनाचे काम असते.ही पध्दती वापरूनच त्याने अनेक बेगडी व ढोंगी शहाण्यांचे शहाणपणाचे सोंग उघडकीस आणले.स्वत:ला शहाणे समजणाऱ्या अनेक प्रतिष्ठितांशी प्रदीर्घ चर्चा करुन त्याला लक्षात आले की ही माणसे शहाणी नाहीत पण आव मात्र आणतात. समाजात तसे वावरतात.त्याच वेळी त्याला स्वत:ला स्वत:च्या शहाणपणाची जाणीव झालेली होती. म्हणून त्याने '' ज्याला स्वत:च्या अज्ञानाची पूर्ण जाणीव असते तोच खरा शहाणा '' अशी व्याख्या केली. ती गृहीत धरुनच कोणत्याही संकल्पनेचे परीक्षण करताना तो स्वत:चे अज्ञान गृहीत धरतो.

सॉक्रेटीसचा स्वत:च्या अज्ञानाचा तात्त्विक आविर्भाव तर इतका उच्च दर्जाला जातो की तो म्हणतो *"I do not think, I know, what I do not know"*[3] म्हणजे "मी असा विचार करीत नाही, की 'मला जे माहित नाही ते मला माहित आहे' '' याचा अर्थ असा की ''मला काहीही ज्ञान नाही.आणि असलेच काही ज्ञान तर मला माझ्या अज्ञानाचे ज्ञान आहे ''

सॉक्रेटीसच्या मते अज्ञान कबूल करणे हे शहाणपणाचे प्रथम लक्षण असते. जो कोणी माणूस स्वत:ला काय माहित आहे किंवा माहित नाही, याचे भान बाळगतो, तोच खरा "काहीतरी जाणणे" या ज्ञानप्रक्रियेकडे वळू शकतो.स्वत:च्या ज्ञानाची मर्यादा कबूल करणे, हाच ज्ञानाचा पाया असतो.हा अर्थात एक प्रकारचा उपहास आहे. पण लोकांना उपहास आवडत नाही, पण थेटपणे अज्ञान कबूल करणे, मान्य करणे सुध्दा लोकांना अवघड जाते. त्यामुळेच त्यांना प्रश्नोत्तर पध्दतीनेच गोंजारावे लागते ! असे सॉक्रेटीसचे म्हणणे आहे.म्हणूनच त्याने धैर्य, संयम, न्याय, दूरदर्शीपणा या सारख्या नैतिक सद्‌गुणांविषयीचे तत्कालिन सुशिक्षित व सुखवस्तू लोकांचे अज्ञान त्याने उघडकीस आणले, पण अतिशय नाजुक पध्दतीने.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

[3]एका प्रसिध्द राजकारणी माणसाकडे सॉक्रेटीस गेला.त्यांची प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी सॉक्रेटीसने जो विचार केला तो असा " या माणसापेक्षा मी शहाणा आहे.कदाचित असे असेल की जाणण्यासारखे काही दोघेही जाणत नसूच, पण त्याला वाटते की त्याला काहीतरी माहित आहे पण वास्तवात त्याला माहित नाही. मला हे ही माहित नाही की मला माहित आहे की नाही. या संदर्भात या मर्यादेपर्यंतच त्याच्यापेक्षा मी शहाणा आहे. मी शहाणा आहे. मी असा विचार करीत नाही की, मला जे माहित नाही ते मला माहित आहे '' ॲपॉलॉजी 21e

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

स्वत:चे अज्ञान हाच ज्ञानाचा विषय बनविणे ही ज्ञानाची मूलभूत पायरी आहे. ते कबूल करणारा आणि म्हणूनच ज्ञानाकडे प्रवास करणारा सॉक्रेटीस हा जगातील सर्वात शहाणा माणूस आहे. (आजही ! ) सॉक्रेटीसचे हे ***"I do not think, I know, what I do not know"*** विधान त्याच्या तत्त्वज्ञानात्मक भूमिकेचे सार आहे.

## ब ) संशय पध्दती (देकार्त)



रेने देकार्त (1596 ते 1650) हा फ्रेंच तत्त्वज्ञ आणि कुशाग्र गणितज्ञ होता.त्याने तत्त्वज्ञानातील बुध्दिवादाचा पाया घातला.बुध्दिवाद म्हणजे आपल्याला जगाचे,मन,आत्मा,ईश्वर इत्यादी ज्ञानाच्या विषयांचे ज्ञान केवळ आपल्या पंच ज्ञानेंद्रियांनी न होता मुख्यत: बुध्दिच्या मार्फत सुसंगत तार्किक विचारातूनच होते असे सांगणारा विचार होय. बुध्दिला देकार्त *'विवेकशक्ति'* म्हणतो.

*René Descartes*
*(31 March 1596 – 11 February 1650)*
*Mallu philosopher and writer*
*The 'Father of Modern*
*Philosophy*



देकार्तने भावना,अनुभव किंवा परंपरा यांना महत्व न देता बुध्दिला महत्व दिले. ही मोठी वैचारिक क्रांती होती. देकार्तपर्यतचे जग परंपरिक समजले जाते.देकार्तने विचार करणारी शक्ती या अर्थाने बुध्दिला प्राधान्य दिले. ही आधुनिक बाब होती.त्यामुळे देकार्तपासून पाश्चात्य जगात आधुनिकता सुरु झाली, असे म्हंटले जते. या अर्थाने देकार्त आधुनिकतेचा जनक होता.

देकार्तने भूमिती,गणित, खगोलशास्त्र,शरीरशास्त्र,मानसशास्त्र,भौतिकशास्त्र आणि तत्त्वज्ञान या सर्व विषयांना अतिशय महत्वाची व मूलगामी दिशा दिली.त्याने मुख्यत:तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोन जगाला दिला.म्हणून देकार्तला ***'आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक'*** *(The Father of Modern Philosophy )* असे म्हणतात.

ज्ञान केवळ रुढी,परंपरा व धर्मग्रंथांमार्फत मिळते,ते ईश्वर देतो असा समज देकार्तपूर्वीच्या काळात होता.माणसाच्या विवेकशक्तिला महत्व तेंव्हा नव्हते.देकार्तच्या मते धर्मग्रंथांपेक्षा माणसाची केवळ विवेकशक्तिच सत्यज्ञान देते.देकार्तच्या मते ज्ञान नेहमी सत्यच असते.देकार्त गणितज्ञ असल्याने गणितात जसे सर्व ज्ञान नि:संदिग्ध आणि सुस्पष्ट (clear and evident) व निश्चितच (definite) असते तसे आपले सर्व ज्ञान असावे,असे त्याचे मत होते.एका अर्थाने देकार्तने तत्त्वज्ञानात गणिती ज्ञानाची पध्दती आणली. गणितासारखेच तत्त्वज्ञान हे काटेकोर असावो, ही त्याची अपेक्षा होती.

Department Of Philosophy, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## देकार्तची सत्यज्ञानाची संकल्पना

1. प्रत्येकाने स्वत:चे अनुभव व निरीक्षण करुन विवेकाने विचार करावा.मग सत्य शोधावे.कुणाचीही तयार मते घेवू नयेत.
2. स्वत:च्या विवेकशक्तिला पटल्याशिवाय कोणतेही ज्ञान सत्य म्हणून स्वीकारु नये.इतर व्यक्ति,धर्मग्रंथ,धर्मसंस्था,परंपरा,संकेत,रुढी,चालीरिती या साऱ्या गोष्टी आपली दिशाभूल करतात.या साऱ्यांचे म्हणणे सत्य म्हणून मान्य केल्यास आपली विचारशक्ति नष्ट होते.
3. ज्यास आपण ज्ञान म्हणतो ते नेहमी नि:संदिग्ध आणि सुस्पष्ट (clear and evident) व निश्चितच (definite) असते.हेच सत्यज्ञान होय.हे तीन ज्ञानाचे निकष आहेत.
4. जर एखाद्या ज्ञानाविषयी संशय निर्माण होत असेल तर ते ज्ञान सत्य नसते.संशय निर्माण होणे म्हणजेच ते ज्ञान सत्य नसणे.
5. आपल्याला सुचणाऱ्या कल्पना नेहमी नि:संदिग्ध व विशिष्ट स्वरुपाच्याच असल्या पाहिजेत.उगाच सुचल्या म्हणून कोणत्याही कल्पना स्वीकारु नयेत.या सुचलेल्या कल्पना सत्यज्ञानाच्या वरील निकषांनानुसारच नि:संदिग्ध व विशिष्ट स्वरुपाच्याच असल्या पाहिजेत.

सत्यज्ञानाच्या या संकल्पनेनुसार देकार्त 'माणसाने विचार कसा करावा' आणि 'सत्यज्ञान कसे शोधावे' हे सांगण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करतो.ही तत्त्वे कोणत्याही व्यक्तिला कधीही उपयोगी पडू शकतात.ती अशी:

## सत्यशोधनाची मार्गदर्शक तत्त्वे

1. कोणतेही विधान स्वत:ला स्पष्टपणे समजले आणि सत्य म्हणून सिध्द करता आले तरच ते स्वीकारावे अन्यथा ते स्वीकारु नये.
2. कोणतीही समस्या सोडविण्यासाठी प्रथम तिचे जास्तीत जास्त लहान लहान भाग करावेत.
3. स्वत:ला सोपे वाटेल त्या भागापासून कठिण भागाकडे जावे.
4. हे करीत असताना 'आपण काहीही वगळत नाही' अशी खात्री करुन घ्यावी.

ही तत्त्वे अवलंबल्यास आपणांस निश्चितरित्या सत्य सापडू शकते, असे देकार्त म्हणतो.पण एखादी गोष्ट सत्य कशी मानावी ? कोणत्या निकषावर तिची सत्यता तपासावी ? यावर देकार्त म्हणतो की जर त्या विधानाच्या किंवा गोष्टीच्या सत्यतेविषयी शंका आली,संशय आला की ती सत्य नाही, असेच समजावे.संशय येणे याचा अर्थच ज्ञान सत्य नसणे. त्याची संशयाची पध्दती पुढीलप्रमाणे :

## देकार्तची संशयाची पध्दती: संशयवाद

देकार्तच्या मते सत्यज्ञानाची संकल्पना पाहाता एखादे विधान करताक्षणी ते विधान सुस्पष्ट,नि:संदिग्ध व निश्चित आहे असे आढळले तरच ते सत्य असतेच.पण संशय आला तर ते सत्य नाही,असेच समजले पाहिजे. उदाहरणार्थ हे दृश्य जग खरेच अस्तित्वात आहे का ? या जगाचे व जगातील माणसांचे, पशुपक्षांचे ज्ञान मला माझ्या ज्ञानेंद्रियांमार्फत होते, हे खरे. पण *ज्ञानेंद्रिये मला फसवतात* असाही अनुभव मला येतोच.उदाहरणार्थ काठी मुळात सरळ असताना ती पाण्यात बुडविली की वाकडी दिसते,दोरीच्या जागी साप दिसतो. याचा अर्थ *माझी इंद्रीये मला निश्चित ज्ञान देत नाहीत.*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



ज्या जगात मी राहातो त्या जगाच्या अस्तित्वावर आणि जगातील माणसांच्या अस्तित्वावर माझा लहानपणापासून विश्वास आहे हे खरे.पण ज्ञानेन्द्रीये फसवतात असे आढळल्याने हे जग व माणसे खरीच अस्तित्वात आहे का ? असा संशय मी घेवू शकतो.जसे मला स्वप्नात जे दिसते ते त्या क्षणाला खरेच वाटत असते,पण जागे झालो की ते खोटे,भासात्मक होते याची जाणीव होते.तसे एखाद्या राक्षसानेच माझ्या डोक्यात जगाची सत्यता भरली असेल किंबहुना त्या राक्षसालाच स्वप्न पडले असून सारे जग,सारी माणसे व मी सुध्दा त्याच्या स्वप्नाचा भाग आहोत; त्याने डोळे उघडले की माझे अस्तित्व संपलेच की ! याचा अर्थ हे जग,माणसे काही सत्य नाहीत ! ज्याअर्थी मला त्यांचा संशय येतो त्याअर्थी ते सत्य नाहीत.

जग,जगातील माणसांप्रमाणे मला ईश्वराचाही संशय येतो.तो खराच आहे की नाही,असा संशय मी घेवू शकतो.आणि संशय येतो याचा अर्थच ईश्वराचे ज्ञान सत्य नाही. आता ईश्वरच संशयास्पद आहे तर त्याच्या अस्तित्वाचा दावा करणारे धर्मग्रंथही सत्य असतील कशावरुन ? त्यांचा संशय येतो, याचा अर्थच ते सत्य नाहीत.अशा रितीन देकार्त ज्ञानाचे विषय असणाऱ्या श्रध्दा,वस्तू या विषयी संशय घेतो.

## मग नि:संशय असे काय आहे ?

तर देकार्तच्या मते 'संशय घेणे' या घटनेबद्दल मात्र मी कसलाही संशय घेवू शकत नाही.ज्या अर्थी संशय घेतला जातो त्याअर्थी संशय घेणाराही असला पाहिजेच ! संशय घेणाऱ्याविषयी संशय घेता येत नाही.तो असतोच. थोडक्यात संशय हा संशय घेणाऱ्याचे अस्तित्व सिध्द करतो. हा संशय घेणारा मी आहे. आता देकार्तच्या मते संशय घेणे म्हणजे विचार करणे.म्हणून मी संशय घेतो म्हणजेच मी विचार करतो.याचाच अर्थ "मी विचार करतो म्हणून मी आहे !" ("*I think therefore I am"* - Cogito ergo sum) किंवा विचार करणे ही कृती संशय घेणे ही वैचारिक कृती असते, म्हणून देकार्त "मी संशय घेतो म्हणून मी आहे" ("*I doubt therefore I am"* ) असा दावा करतो. संशय,विचार ही ज्ञानाची क्रिया आहे.विचार करणे = जाणणे होय.म्हणून "मी जाणतो म्हणून मी आहे !"

आता, हा मी कोण ? तर देकार्तच्या मते मी म्हणजे आत्मा.विचार करण्याची क्षमता केवळ आत्म्यातच असते. आत्मा जर नसता तर तो विचार करु शकला नसता.पण तो विचार करतो तर तो अस्तित्वातही असला पाहिजे.अशा रितीने आत्म्याचे अस्तित्व सिध्द होते.स्वत:ची जाणीव असणे म्हणजे मी.

मला जशी जाणीव आहे, तशीच जाणीव इतर माणसांनाही आहे.त्यामुळे इतर माणसेही विचार करतात.त्यामुळे तीही माणसे अस्तित्वात आहेत.त्यांनाही आत्मा आहे.म्हणून त्यांना व त्यांच्या आत्म्यांनाही अस्तित्व आहे.

आता, हा आत्मा कुणी निर्माण केला? त्याला निर्माण करणारा माझ्याशिवाय दुसराच कुणीतरी असला पाहिजे, कारण मी काही स्वत:ला निर्माण करु शकत नाही.हा कुणीतरी म्हणजे ईश्वर ! ईश्वर जर नसता तर मी नसतो.पण मी आहे याचा अर्थ माझा निर्माता ईश्वर अस्तित्वात आहे.ईश्वर 'मी' ला म्हणजे आत्म्याला आणि माझ्या शरीरालाही निर्माण करतो तसा तो इतरांच्या आत्म्यांना आणि शरीरांनाही निर्माण करतो.म्हणून ईश्वरही अस्तित्वात असला पाहिजे.ईश्वर हे विचार करणारे सर्वश्रेष्ठ अस्तित्व आहे.

अशा रितीने देकार्त संशयाचे हत्यार वापरुन जगाच्या, इतरांच्या व ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका घेतो.पण विचार करण्याच्या मार्गानेच सर्वांचे अस्तित्व स्वीकारतो.देकार्त आत्मा, ईश्वर मानणारा होता. ईश्वराने जग निर्माण केले.या जगाची रचना एखाद्या घड्याळाप्रमाणे यांत्रिक आहे,असे तो समजत असे.

परीक्षण:

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

देकार्तच्या मते मानवी व्यक्तित्व शरीर आणि मन या दोन घटकांनी बनलेले आहे.विस्तार हा शरीराच गुणधर्म आहे तर जाणीव हा मनाचा गुणधर्म आहे.जाणण्याची प्रक्रिया मनाकडूनच घडते.ती घडते शरीरात पण मनच केवळ जाणते.शरीर जाणू शकत नाही.मनाच्या दोन शक्ति आहेत :

(1) **अंत:प्रज्ञा (Intution)**

(2) **निगमनात्मकता (Deductive reasoning)**

या दोन कार्यशक्तिंच्या आधारेच माणसाला यथार्थ ज्ञान अथवा जाणीव होवू शकते. 2 + 2 = 4 हे ज्ञान पंचज्ञानेद्रीयांनी म्हणजे शरीराने होत नाही तर फक्त मनानेच होते.म्हणजे बुध्दीने,अंत:प्रज्ञेनेच होते.असे अंत:प्रज्ञात्मक ज्ञान हा जणू काही साक्षात्कारच असतो, असे देकार्त म्हणतो.हा भाग समजणे कठीण पण अशक्य नाही.



निगमनात्मकता म्हणजे सामान्याकडून विशिष्टाकडे जाणे.सत्य विधानाच्या आधारे दुसरे मिळणारे विधान सत्यच असते.तेथे संशयाला जागा नसते.मी विचार करतो म्हणून मी आहे, हे अंत:प्रज्ञात्म निगमन आहे. पण तो तर्क नाही, तर साक्षात्कार आहे ! असे देकार्तचे म्हणणे आहे.

## गणिती पध्दतीचे तत्त्वज्ञान

देकार्त गणिती होता. गणितात निश्चित, नि:संदिग्ध सत्ये असतात. 2+2 = 4 हे इतके नि:संशय सत्य आहे की त्याविषयी कसलाच संशय अशक्य आहे.गणितातील 2 हे विधानातील सत्य स्वंयसिध्द आहे.काटकोनाची बेरीज 180 अंश होते, हे असेच विधान स्वंयसिध्द सत्य विधान आहे.तशी सत्ये तत्त्वज्ञानात नसतात, पण ती असावीत, अशी देकार्तची धारणा होती.त्यामुळे गणिती पध्दतीवर तत्त्वज्ञान रचले जावे, असे त्याचे म्हणणे होते.

गणिती पध्दत म्हणजे स्वंयसिध्द विधानातील सत्य तत्त्वांपासून मिळणारी दुसरी स्वयंसिध्द सत्ये (किंवा स्वयंसिध्द सत्य विधाने ) निष्कर्ष रूपात मिळविणे.असा निष्कर्ष निगमानाने मिळतो.आणि स्वयंसिध्दता अंत:प्रज्ञेने जाणवते, असे देकार्त म्हणतो.हीच पध्दत तत्त्वचिंतनात उपयोगात आणल्यास तत्त्वज्ञानही गणिताच्या दर्जाला प्रतिष्ठित होईल असा त्याचा विश्वास होता.गणिती पध्दत वापरुनच त्याचे संशयाची पध्दती रचली.

देकार्तचा संशय हा सामान्य माणसाचा इतरांवर अविश्वास दाखवणारा व्यावहारिक संशय नाही.तो संशय ***तत्त्वज्ञानात्मक संशय (Philosophical doubt)*** आहे.तो संशय घेण्याकरिता संशय घ्यावयाचा असा नसून ' सत्यज्ञानाकरिता संशय' असा आहे. संशयाची ही पध्दती विचार नष्ट करणारी नाही तर विचार निर्माण करणारी पध्दती आहे. ती देकार्तने दिली म्हणून तिला ***'कार्तेशियन पध्दती' (Cartesian[4] Doubt)*** म्हणतात. ती संशय वापरुन केली गेली म्हणून तिला ***'संशयाची पध्दती' (The Method of Doubt)*** म्हणतात.हा देकार्तचा संशयवाद आहे.पण तो विघातक नसून विधायक आहे. तो ज्ञान नष्ट करणारा नाही तर निश्चित ज्ञन देणारा आहे. देकार्तने हे त्याचे सारे तत्त्वज्ञान ***'चिंतने' (Meditions)*** या ग्रंथात मांडले.

## 3) वाद पध्दती : (वाद,जल्प आणि वितण्ड )

भारतीय तत्त्वज्ञानातील 'न्याय दर्शन' या नावाने परिचित असणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या संप्रदायाने ही वादपध्दती विकसित केली. ही चर्चा करण्याची एक महत्वाची पध्दती आहे. नेहमीच्या बोलण्यात,दैनंदिन वादविवादात, वादविवाद स्पर्धेत आणि आजच्या न्यायालयात ही पध्दती उपयोगी असल्याचे आढळेल.

[4] *Cartesian* हा शब्द *Descartes* या नावापासून बनतो. *Descarte* हे नाव लॅटीन आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

वादपध्दती,ज्ञानाची साधने आणि तर्काचे नियम हे न्यायदर्शनाचे अभ्यासाचे विषय आहेत.यथार्थ ज्ञान व अथार्थ ज्ञान यांची चर्चा न्याय दर्शन करते.कोणत्याही विषयाची योग्य चिकित्सा कशी करता येते,याचे प्रशिक्षण या पध्दतीतून मिळते.





**आदि शंकराचार्य सहकारी तत्त्वज्ञांशी चर्चा करताना** (कल्पनाचित्र)

निर्दोष विचार, चर्चा आणि अनुमान यांना आवश्यक असलेले नियम म्हणजे न्याय होत, असे न्याय दर्शन सांगते,[5] हा वाद जिथे ज्या ठिकाणी चालतो ते न्यायालय.तो कसा चालावा याचे प्रशिक्षण ज्या सभेत होते तिला **'*तद्विद्य संभाषा परिषद*'** म्हणतात. तद्विद्य म्हणजे तज्ञ आणि संभाषा म्हणजे चर्चा,परिषद म्हणजे सभा [6] . या सभेची रचना पुढीलप्रमाणे असते :

1. ***वादी :*** चर्चेचा मुद्दा उपस्थित करणारा. (फिर्यादी)
2. ***प्रतिवादी :*** चर्चेत विरोध करुन आपले मुद्दे मांडणारा. (अशील )
3. ***सभापति :*** वादाचा आरंभ करणे,त्यावर लक्ष ठेवणे आणि शेवटी निर्णय देणे, ही कामे करणारा विद्वान अधिकारी व्यक्ति.यालाच *'मध्यस्थ'* असेही म्हणतात. (जज् / न्यायाधीश.)
4. ***प्राश्निक :*** अधूनमधून सूचक प्रश्न करणारे (प्रेक्षक /साक्षीदार)

अशी रचना झाल्यानंतर जी चर्चा केली जाते तिलाच ***वादविवाद*** म्हणतात. पण वाद कसाही घालावयाचा नसतो, तर वादपध्दतीचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेवून वाद घालावयाचा असतो.अलिकडील काळात संसद, विधीमंडळ, विविध प्रकारचे परिसंवाद,परिषदे,वादस्पर्धा आणि विविध वृत्तवाहिन्यांवर अशी चर्चा घडताना आपण पाहातो.या वादाचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

## अ) वाद :

वाद म्हणजे एखाद्या विषयातील तत्त्व कळावे किंवा तो विषय कळावा,या हेतूने सुरु केलेली चर्चा. या चर्चेत कोणतेही खोटे पुरावे सादर करवयाचे नसतात.समजा चुकून केले गेले तर ते मागे घेवून चर्चा पुढे न्यावयाची असते.ही चर्चा वादी आणि प्रतिवादी यांच्यात होते.या दोघात कुणीतरी विजयी होवू शकतो.पण वाद बरोबरीत सुटला तर अंमित निर्णय देण्याचा अधिकार सभापतिचा असतो.त्या निर्णयानंतर पुन्हा कुणी वाद घालावयाचा

[5]म्हणून या दर्शनास ' न्यायशास्त्र' असे म्हंटले आहे.वैदिक संस्कृतीचा इतिहास पान 184 लक्ष्मणशास्त्री जोशी आवृत्ती दुसरी 1972 प्राज्ञपाठशाळा, वाई

[6]किंवा भारतीय तर्कशास्त्राची रूपरेखा- सुरेंद्र बारलिंगे , क्रांतिप्रभा पांडे ' परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

नसतो.वाद घालावयाचाच असेल तर ज्या मुद्‌द्यावर विजय मिळविलेला असतो,त्याच्या पुढील मुद्‌द्यावर वाद घालावयाचा असतो.उदाहरणार्थ ,

**चर्चा विषय:** आत्म्याचे अस्तित्व

**वादी:** आत्मा आहे. कारण तो नित्य आहे.

**प्रतिवादी:** आत्मा अस्तित्वात नाही. कारण त्याचे अस्तित्व जाणवत नाही.त्याचे ज्ञान अनित्य आहे



**ब) जल्प** :

वादाच्या या प्रकारात दुसऱ्याला हरविणे एवढाच हेतू असतो, त्याच वेळी स्वत: कोणताही पुरावा द्यावयाचा नाही, असे केले जाते.दुसरा कोठे चुक करतो त्यावर बारीक लक्ष ठेवून त्या चुकीचेच भांडवल करुन त्याचा पराभव झाला, अशी घोषणा केली जाते.आणि चर्चा बंद केली जाते.उदाहरणार्थ,

**अ :** जे जे अज (जे जन्मत नाही ) ते नित्य असते. जसा ईश्वर.
**ब :** जे नित्य असते ते अज असते, जसा ईश्वर .

किंवा

माणूस इथून तिथून सारखाच !
या बोलण्याला काही अर्थ नाही .
मग तुझ्या बोलण्यालाही काही अर्थ नाही.
तुझ्याही बोलण्याला काय अर्थ आहे ?

**क) वितण्डा:**

वादाच्या या प्रकारात दुसऱ्याला हरविणे हा हेतू सुध्दा नसतो. तर केवळ शब्दाला शब्द वाढविणे, निष्फळ चर्चा वाढविणे,कोणताही निर्णय स्वत: न घेणे आणि दुसऱ्याला ही घेवू न देणे,एवढेच असते. अशी चर्चा टाळावयाची असते आणि दुसऱ्याला करु द्यावयाची नसते.पण दुदैवाने बहुधा सर्वत्र वितण्डवादच घातला जातो. उदाहरणार्थ,

आता साक्षरता प्रसाराची चळवळ केली पाहिजे.
कशासाठी ?
म्हणजे काय ? देशाच्या प्रगती !
छे ! अमेरिका, जर्मनी यांनी काय साक्षरता प्रसार केला होता काय ? त्यांनी प्रगती केलीच ना ?
बरं , मग सगळ्यांना मिलीटरी ट्रेनिंग सक्तीचे करु काय ?
काय मरायचयं काय ? उलट युध्द होईल, प्रगती तर लांबच.
ठिकाय, मग लोकांमध्ये ऐक्य निर्माण करु.
अरे बापरे ! हे सगळे अठरापगड जातीचे एकत्र येणार !! अशक्य.
बरंस, मग तुम्हीच काहीतरी सुचवा.
नाही मी काही अजून विचार केलेला नाही.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

किंवा
ए, जास्त शानपना करु नको.
ए,तू शानपना दाखवू नको.
तू कोण विचारणार ?
तू कोण लै शाना ?
.. .. ..

## पूर्वपक्ष - उत्तरपक्ष पध्दती:

कोणत्याही वादात दोन बाजू असतात.पहिली बाजू : वादविषयाच्या समर्थनासाठी बोलणारी तर दुसरी - वादविषयाच्या विरुध्द बोलणारी. बोलणाऱ्या या दोन्ही बाजूंना *'पक्ष'*[7] म्हणतात. एकाला पूर्वपक्ष तर दुसऱ्याला उत्तरपक्ष म्हणतात.पूर्वपक्ष म्हणजे समोरचा आपल्या विरोधी विचार मांडणारा पक्ष आणि उत्तरपक्ष म्हणजे स्वत:चा विचार मांडणारा पक्ष.स्वत:चे मत म्हणजे *सिध्दान्त.*

स्वत:चे मत मांडण्याला ***मंडन*** म्हणतात.तर दुसऱ्याचे मत खोडणे म्हणजे ***खंडन.*** समोरच्याचे म्हणणे काय आहे ? ते समजावून घेवून मग त्याला काय म्हणावयाचे आहे, हे आधी आपणच मांडावयाचे.मग स्वत:चे म्हणणे मांडावयाचे.(म्हणजेच उत्तरपक्ष नेहमी पूर्वपक्षाला काय म्हणावयाचे आहे ते आधी मांडतो,मग स्वत:चे मत मांडतो.) थोडक्यात ज्याचे खंडन करावयाचे तो ***'पूर्वपक्ष'*** व ज्याचे समर्थन करावयाचे तो ***'उत्तरपक्ष'.*** या प्रकारात दोघांचाही विकास होतो.कुणाचीही बाजू कमकुवत राहात नाही.

भारतीय दर्शनांचा विकास याच विशिष्ट पध्दतींनी झाला.ही जणू त्यांची methodology च होती. एकमेकांचे अस्तित्व टिकवित विरोधक दर्शनाचाही विकास होईल,याची काळजी घेत हा विकास झाला.त्यामुळे एकाचा अभ्यास म्हणजे इतरांचाही अभ्यास ! या पध्दतीला ***'पूर्वपक्ष - उत्तरपक्ष पध्दती'*** किंवा ***'खंडन -मंडन पध्दती'*** *म्हणतात.*

-----------------------------------------

[7] पक्ष म्हणजे पंख. पक्षाला पंख असतात.त्या त्याच्या दोन बाजू असतात.म्हणून पक्ष = बाजू. पक्षकार = बाजू असणारा. येथे बाजू याचा अर्थ भूमिका. न्यायालयाच्या भाषेत बाजू = तक्रार अथवा तक्रारील उत्तर देणे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner